# पुणे विद्यापीठ

**परीक्षा विभाग**
गणेशखिंड, पुणे-४११००७.

दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६०११३१, २५६०१३९१
२५६०११४७, २५६०११५०
२५६०११३३, २५६०११३५
२५६०११३६

टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६०११३१
वेबसाइट : www.unipune.ernet.in
इ-मेल : coe@unipune.ernet.in


दि. १२/०८/२००९

संदर्भ क्र. २१८२

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत वाणिज्य महाविद्यालये,

**विषय:—** बी.बी.ए./बी.सी.ए./बी.बी.एम. जुन्या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २००८—०९ पूर्वी प्रवेशित विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे बाबत...

**संदर्भ:—** विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचे पत्र क्र.सीए/३८१० दिनांक.०७/०८/२००९

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून आपणांस खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) जे विद्यार्थी बी.बी.ए./बी.सी.ए./बी.एफ.टी (बी.बी.एम.) या जुन्या अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षास प्रवेश घेऊन, उत्तीर्ण होऊन अथवा ए.टी.के.टी. मिळवून व्दितीय वर्षाच्या प्रवेशास पात्र झाले आहेत. अशा सर्व विद्यार्थ्यांना सुधारीत अभ्यासक्रम २००८ च्या व्दितीय वर्षास प्रवेश दिला असेलच.

२) ज्या विद्यार्थ्यांनी बी.सी.ए. या जुन्या अभ्यासक्रमाच्या पहील्या वर्षाच्या पहील्या सत्रामध्ये 'न्यूमॅरिकल मेथडस' (Numerical Methods) हा विषय उत्तीर्ण केला असल्याने त्या विषयास सूट देऊन सुधारित अभ्यासक्रमाच्या व्दितीय वर्षाच्या पहील्या सत्रात त्यांनी 'प्रोग्रॅमिंग प्रिंसिपल्स ॲन्ड अल्गोरिदमस' (Programming Principles and Algorithms) हा विषय देणे बंधनकारक आहे.

३) प्रथम वर्ष जुन्या अभ्यासक्रमाप्रमाणे उत्तीर्ण झालेल्या अथवा ए.टी.के.टी. मिळालेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्षास नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षेस बसावे लागेल. अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज यापूर्वी जुन्या अभ्यासक्रमाप्रमाणे भरलेले आहेत. त्यांचे परीक्षा अर्ज नवीन अभ्यासक्रमानुसार बदलून घेण्यात येतील. आणि नवीन अभ्यासक्रमाप्रमाणे विषयांची नोंद त्यांच्या प्रवेश पत्रावर (Admit Card) केली जाईल. विद्यार्थ्यांच्या प्रवेश पत्रावर (Admit Card) 'प्रोग्रॅमिंग प्रिंसिपल्स ॲन्ड अल्गोरिदमस' या विषयाचाही उल्लेख केला जाईल व त्या प्रमाणे विद्यार्थ्यांनी परीक्षा देणे आवश्यक आहे.

मा. प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, सदर बाब सर्व विद्यार्थ्यांच्या/शिक्षकांच्या व संबंधितांच्या नजरेस आणून द्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रक